पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 18 , लेखा विभाग
क्र.लेखा/16/कावि/४६८/2021
दिनांक - १८/5/2021

विषय – बँक वसुली वजाती बाबत

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून संबंधित कर्मचा-यांच्या पगार बिलातून बँक वसुली वजाती केली जाते. अशा वसुल रकमांची दरमहा केलेली वसूली लेखा विभागा कडून संबंधित पतसंस्थेला किंवा बॅकेला ई. सी. एस. व्दारे पाठविणेत येते. या साठी लेखा विभागास सदर खात्याचे ई. सी. एस. करणे कामी नोंदणी करण्याची ची आवश्यकता असते या बाबत लेखा विभागाने वेळोवेळी विभागांना सूचना दिलेल्या आहेत .सर्व विभागानी संबंधित कर्मचा-याच्या पगार बिलातून बॅक वसुली करण्या पूर्वी त्या पतसंस्थेकडून अथवा बँकेडून इ.सी. एस. फॉर्म भरून घेवून त्याची प्रत लेखा विभागाकडे सदर करणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा अशा प्रकारची पगारबिलातून केलेली बॅक वसुली संबंधित पतसंस्थेकडे / बॅकेकडे पाठविता येत नाही.

तरी संबंधित आहरण / वितरण अधिकार, कर्मचारी, व संबंधित विभागांनी सदरचा बँकेचा ई. सी. एस. फॉर्म लेखा विभागाकडे सादर करण्याची दक्षता घ्यावी. असा ई.सी.एस. फॉर्म लेखा विभागाकडे सादर न केल्यास संबंधित कर्मचा-याची बँक वसुली वजाती रक्कम पतसंस्थेस / बँकेस प्राप्त न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी विभागाची अथवा संबंधित कर्मचा-यांची राहिल. याची स्पष्ट नोंद घ्यावी. तसेच संबंधित कर्मचा-यानी आपल्या पगारातून कपात झालेली रक्कम सदर संस्थेस प्राप्त झाल्याची खात्री करावी.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिपरी-१८